
श्रीगजानन प्रसन्न.

# महाराष्ट्र मेळ्याचीं

## सन १९२३ चीं पद्यें.



नमो राष्ट्रभक्ता नमो धर्मसक्ता ।
नमो पारतंत्र्यारि हे हिंदभक्ता ॥
तुझ्या पुण्यजन्में अम्ही पूत झालों ।
म्हणोनी तुझ्या कर्ममार्गी मिळालों ॥ १ ॥

किंमत एक आणा.

प्रकाशकः—शंकर कृष्ण पेठे, व्यवस्थापक, महाराष्ट्र मेळा
काळा हौद–शुक्रवार १९३, पुणे.

मुद्रकः—अनंत सखाराम गोखले.
'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणें.

# गद्यनिवेदन.

श्रीगणेशोत्सवांत जन-मनरंजन करून लोकशिक्षणाचे पवित्र कार्यास यथाशक्ति हातभार लावावा म्हणून, महाराष्ट्र मेळा दरसाल निघत असतो. तसेंच आळीकर थोर गृहस्थांपैकीं विशेषतः श्री॰ वर्वे, नातू, जोगळेकर आणि बापट इत्यादि मंडळीचा सर्व शहर-भर आप्तेष्टांचा व स्नेहीसोबत्यांचा संबंध असलेमुळें; मेळयास सर्वांचें प्रेमाचें निमंत्रण स्वीकारून सार्वजनिक गणपतीपुढें हजेरी देतां येत नाहीं; व निमंत्रित घरीं न जावें तर तीं घरें स्नेहसंबंधाचीं व आप्तेष्टांचीं असल्यामुळें त्यांचा आमचे तरुण मंडळीवर मोठा घुस्सा होतो; म्हणून चालू सालीं मेळयाचे दोन भाग केले आहेत. एक प्रौढ विद्यार्थ्यांचा व दुसरा वीस वर्षांपेक्षां कमी वयाचे विद्यार्थ्यांचा. शिवाय चालू सालीं जो लहान विद्यार्थ्यांचा मेळा आहे, तो विशिष्ट धोरणानेंच वागणार आहे. व त्याची एकंदर रचना, धोरण व पद्धत हीं कांहीं विशेष रीतीनें केलीं आहेत हें सर्वांस विचारांतीं दिसून येईलच.

याकरितां सदरहू मेळयाचें कार्य व पद्धत हीं पसंत असल्यास त्याचें कोडकौतुक पुरवून त्यास सर्व प्रकारें मदत करणें हें जनतारूपी जनार्दनाचेच हातांत आहे.

आणि यावरच मेळयांतील आम्हां तरुण मंडळीचे पुढील विचार व लोकोपयोगी संस्थांना पैशाची मदत करणें इत्यादि गोष्टी अवलंबून असतात. हेंही सुज्ञ लोक विसरणार नाहींत अशी आशा आहे.

चालू सालीं आमच्या आळींतील श्रीमंत सरदार दाजीसाहेब नातू यांच्या पत्नी सौ॰ इंदिराबाई नातू, आळीकर मित्र 'बलवन्तानुज'

( बापट ), सुप्रसिद्ध कवि अज्ञातवासी, ह. भ. प. पुरुषोत्तमबोवा जोशी या सर्वांनीं नवीन पद्यें सांगलांक्षणींच मोठ्या प्रेमानें करून दिलीं; याबद्दल या सर्वांचे जितके उपकार मानावे तितके थोडेच. तसेंच माझे मित्र गायन-शिक्षक श्री॰ दिवेकर व ड्रील शिक्षक श्री॰ पर्वते यांची मदत तर बिनमोलच झाली आहे. म्हणून त्यांचे आभार कोणत्या शब्दांनीं मानावे तें समजत नाहीं.

शिवाय ज्या पालक मंडळीनीं आपलीं मुलें मेळ्यांत पाठवून लोकशिक्षणाच्या ह्या पवित्र कार्यांत मला जी मदत केली त्याबद्दल त्यांचा मी अत्यंत ऋणी आहें.

तसेंच आमचे शिंपी-कोर्टासमोरचे श्री॰ चांदेकर-यांनीं वेळेवर व थोड्या खर्चांत कपडे वगैरे शिवून दिल्याबद्दल; व 'विजय' प्रेसचे मालक श्री॰ आप्पासाहेब गोखले यांनीं पुस्तकाची छपाई स्वस्त, सुबक व वेळेवर करून दिल्याबद्दल त्यांचा; आणि तुळशीबागे-जवळील काष्ठौषधी दुकानांतील पेन्टर श्री॰ ढेकणे, यांचा व श्री॰ गोवंडे यांनीं भाले वगैरे उत्तम तयार करून दिल्याबद्दल त्यांचा; या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहें.

याशिवाय अनेक मदतगार मंडळींचे मजवर उपकार आहेत. त्यांचे विस्मरणानें अगर अन्य कांहीं कारणानें आभार मानणें राहिलें आहे; त्यांनीं क्षमा करावी. व सालाबादप्रमाणें सर्व हित-चिंतकांस शक्य तितकी जास्त मदत करण्याची बुद्धि व अनुकूलता दे, अशी श्रीगणेशचरणीं प्रार्थना करून हें लांबलेलें कंटाळवाणें गद्यनिवेदन संपवितों.

मिति भाद्रपद
शु. ४ शके १८४५
ता. १४।९।२३

**शंकर कृष्ण पेठे,**
**व्यवस्थापक.**

# महाराष्ट्र मेळ्याचीं पद्यें.

## पद पहिलें. चाल—चलारे गणराया वंदा.

नमो श्रीगणनायक पहिला ॥
पार्वतिसुत गंगाधरतनया, अखिल विश्वपाळा ॥ ध्रु० ॥
नमो श्रीसरस्वती देवी ।
ज्ञानसत्र तव अम्हां बालकां, सदा खुलें ठेवीं ॥ १ ॥
नमो श्रीऋषिगण मुनिदेवा ।
वरदहस्त तो सदा कृपेचा, अम्हांवरी ठेवा ॥ २ ॥
नमो श्रीसंत कवीशांतें ।
उपदेशामृत ज्यांचें जागृत, मृतासही करितें ॥ ३ ॥
नमो श्रीपूर्वज वीरांना ।
वीररसाची हृदया भरती, स्वातंत्र्यीं आणा ॥ ४ ॥
नमो श्रीआर्यभूमिमाते ।
स्वातंत्र्यास्तव तुझ्या अर्पुंया, नश्वर देहातें ॥ ५ ॥
नमो श्रीजनता जगदीशा ।
“ महाराष्ट्र मेळा ” हा मागे, कृपेचीच भिक्षा ॥ ६ ॥

---

## पद दुसरें. चाल—त्यजि भक्तासाठीं.

श्रीगंगाधरतनया ॥ तारिया हिन्द जनतेला ॥ ध्रु० ॥
श्रीराम कृष्ण हनुमंत । ज्ञानोबा तुकया संत ॥
अवतार झरा अनिवार । हा कसा कोरडा पडला ॥ १ ॥
सिंहाचे बच्चे असुनी । मेंढरें कशीं जा बनुनी ॥
स्वाभिमान झाला ठार । अंधार भयंकर पडला ॥ २ ॥

धन-धान्य-साधनीं भरला । दुसऱ्यांसी पुरुनी उरला ॥
परि अन्नाविण हो ठार । अजि पहा देश हा आपुला ॥३॥
परक्यांनीं यावें जावें । मनसोक्त तुम्हांसि लुटावें ॥
ना कुणासही दरकार । हो षंढ कसेरे बनलां ॥ ४ ॥
शुभस्मरण करा पितरांचें । शिव-समर्थ-बलवंताचें ॥
या क्षणीं करा निर्धार । दुस्मान-कंदना पहिला ॥ ५ ॥
घ्या सत्याची समशेर । धैर्याचा घ्या घ्या तीर ॥
जोरसे कराया वार । जो भेदि शत्रु-हृदयाला ॥ ६ ॥
सत्पुरुष-समागम ढाल । घेउनी करा तुम्हि चाल ॥
फोडुनी करा खिंडार । परमात्मरूप बघण्याला ॥ ७ ॥
स्वातंत्र्यसमाधी लावा । सच्छील सुमार्गी लावा ॥
बलवन्ता तुज हा हार । वाहतों प्रभु शिरकमला ॥ ८ ॥

---

## पद तिसरें. चाल—आनबान.

वंदुं हिन्द-देवि-तनय, तिलक गुरुवरा ॥ ध्रु० ॥
राष्ट्रोद्धर, जनहितकर । धीर वीर अग्रणि नर ॥
दिनदुनियेचा आधार । कोहिनुर हिरा ॥ १ ॥
श्यामवर्ण घननिलसम । दिव्यमूर्ति शोभमान ॥
प्रकटवि देशाभिमान । सगुण साजिरा ॥ २ ॥
ध्याऊं गाऊं गुणनिधान । सुयश कीर्ति धन्य धन्य ॥
जनताप्रिय लोकमान्य । शोभसी खरा ॥ ३ ॥
देशाचा ऱ्हास होई । वालि त्यासि कोणि नाहीं ॥
गांधि महात्माहि पाही । बंधनीं खरा ॥ ४ ॥
उगवे नव कमल जळीं । विकसवि तव तेजबली ॥
अवतरोनी या काळीं । इंदुशेखरा ॥ ५ ॥

## पद चवथें. मल्हार—शान्त हरि.

वंद्य मज एक जगिं आर्यभूमी खरी ॥
तद्यशोगायनीं रमत ही वैखरी ॥ धृ० ॥
धर्मजनकादिकां । जी खनी प्रसवली ॥
'कर्मभू' भूतलीं । गर्जली अजवरी ॥ १ ॥
धर्मक्षय होइतों । श्रीहरी धांवतो ॥
संकटीं रक्षितो । मायभूमी परी ॥ २ ॥

---

## पद पांचवें. राग—सोहनी.

श्रीगणपति गुणगान ॥ आधीं ॥ धृ० ॥
ब्रह्मादिकही कार्यारंभीं । करिति गजानन ध्यान ॥ १ ॥
कार्यसिद्धि होण्यातें करणें । प्रभुनामामृत पान ॥ ॥ २ ॥
भवभयहारक हाच विनायक । स्तवितां मिळतें ज्ञान ॥ ३ ॥
कलीयुगामधिं चंडि-विनायक । दैवत कथिलें जाण ॥ ४ ॥
महाराष्ट्र मेळाही आधीं । करित गजानन गान ॥ ५ ॥

---

## पद सहावें. भैरवी—नृपतिकन्या.

प्रकट जगतीं त्वरि आ ऽ ऽ ऽ तां ।
वीर महाराष्ट्रा ॥ धृ० ॥
आठवी शिव भूपती । आठवी तव संस्कृती ॥
कलह मोडी । ऐक्य जोडी । यांत गोडी । मर्द महाराष्ट्रा ॥१॥
'नर जरी करणी करी । बनत तो जगतीं हरी' ॥
वचन असलें । सत्य केलें । उद्धरीलें । बद्ध महाराष्ट्रा ॥ २ ॥
तोच तूं आजि राजसा । बंदिवान् बनसी कसा ॥
क्लैब्यवृत्ती । त्यजुनि जगतीं । मिळवि कीर्ति ।
ऊठ ऊठ आतां ॥ ३ ॥

### पद सातवें. भीमपलास—प्रेमसेवा.

श्रीगणेशा शरण, सकल जाऊं चला ॥
तोचि करिल हरण दास्ययातनेला ॥ १ ॥
न्यायासनीं अंध । साधूजनां कैद ।
कांहीं न धरबंद ॥ ब्युरॉक्रसीला ॥ २ ॥
खाण्या न हिन्दांस । कपडा न गरिबांस ।
षंढत्व दे खास ॥ परराज्य सकलां ॥ ३ ॥
अवतार प्रभुराज । घेवोनियां आज ।
राखी आतां लाज ॥ प्रार्थना ही तुला ॥ ४ ॥

---

### पद आठवें. भैरवी—राम पाहिला.

धांव लौकरी । बघसि । अंत कां हरी ॥ धृ० ॥
धर्मग्लानि जाहली । नास्तिकवृत्ति मातली ।
कठिण वेळ पातली । सज्जनांवरी ॥ १ ॥
सत्यधर्म सोडुनी । वागती किती जनीं ।
शासिता तया कुणी । होईना परी ॥ २ ॥
पूज्य जी आम्हां अती । गोमाता तिज वधिती ।
बघतां हे जळत अती । हृदय अंतरीं ॥ ३ ॥
धर्मरक्षणार्थ कीं । नृपतीपद हें लोकीं ।
राज्ययंत्र परि परकी । आज हें वरी ॥ ४ ॥
धर्मरक्षणा तरी । अवतर तूं श्रीहरी ।
आर्यदेश उद्धरी । मर्दुनी अरी ॥ ५ ॥

---

## पद नववें. चाल—तूं टाक चिरुनि ही मान.

भक्तिनें पुजा प्रभुराय । धरोनी पाय ।
जगिं एक असे या, भव तरण्याला, भक्ती स्वल्प उपाय ॥धृ०॥

अव्यक्त ब्रह्म बहु कठिण ।
म्हणुनिया मूर्तिही सगुण ।
भक्तिनें पुजीं मनिं अणुन ।
त्या जन्म मरणही, चुकेल सांगे, पार्थातें प्रभुराय ॥ १ ॥

इंद्रियें युक्तिनें रोधा ।
प्रभुचरणीं स्थिर मन बांधा ।
हृदयांत मूर्ति मग शोधा ।
जरि कराल ऐसें, तरिच दयाघन, दाविल अपुले पाय ॥२॥

इतुकेंहि जरी नच करवे ।
तरि नाम मुखानें गावें ।
कर्मार्पण हरिस करावें ।
तरी पावे मत्पद प्राणी, श्रीहरि, सांगे स्वल्प उपाय ॥ ३ ॥

सर्वांत शांति बहु श्रेष्ट ।
परि एकच होय वासिष्ट ।
ज्ञानाधिन शास्त्रें बिकट ।
यालागी संतीं, सगुण भक्तिचा कथिला सुलभ उपाय ॥४॥

दृढ धरुनि चित्तिं सद्भाव ।
मुखिं गावें प्रभुचें नांव ।
प्रकटेल हृदयिं मग देव ।
श्रीतुकाराम, ज्ञानेश्वर सांगति, निश्चित हा सदुपाय ॥५॥

हरिकथानिरूपण आधीं ।
तदनंतर इतर उपाधी ।
प्रभुकृपा टाळिते व्याधी ।
श्री रामदास स्वामीही सांगती सर्वां हाच उपाय ॥ ६ ॥

नच करणें व्रत उपवास ।
शास्त्रादिक जड अभ्यास ।
व्हावया ईश प्राप्तीस ।
सांगितला संतीं भक्तिमार्ग हा, सर्वां सुलभ उपाय ॥ ७ ॥

परदास्य नरकवासास ।
चुकविणें हीच जरि आस ।
स्वातंत्र्य स्वर्ग मिळण्यास ।
व्हा लीन हरिपदीं, कृष्णात्मजही, प्रेमें हरिगुण गाय ॥८॥

---

पद दहावें. सारंग—जमुनातट.

करुणाकर प्रार्थि प्रभो तुज ॥ धृ० ॥

त्राहि त्राहि बघ षड्रिपु करिती ।
सुचुं न देत तव नाम दयाळा ॥ १ ॥

मन मम स्थिर हें मुळीं न राहतें ।
कसें दिसे ? तव ध्यान हरीरे ॥ २ ॥

लीन दीन हा चरणीं तुमच्या ।
अभय मळा द्या स्थान पदाब्जीं ॥ ३ ॥

---

## पद अकरावें. राग—बागेश्री.

गाऊं सदा प्रभुनाम । प्रेमें ॥ धृ० ॥

परमेशाच्या नामा गातां । जळती अघनग जाण ॥ १ ॥

भावें गातां प्रभुनामातें । पुरवित तो मनकाम ॥ २ ॥

श्रीरामाच्या नामें तरले । जडनिर्जिव पाषाण ॥ ३ ॥

नामचि तारक भवभयहारक । शांतिसदन सुखधाम ४

प्रभुनामातें गाण्या प्राण्या । पडति न कांहीं दाम ॥ ५ ॥

महाराष्ट्र मेळाही गाई । आधीं प्रभुचें नाम ॥६॥

---

## पद बारावें. चाल—सबसे राम०

महाराष्ट्र नांव ऐकोनी रिपुनें चळचळ कापावें ॥ धृ० ॥

परदास्याची बेडी तोडी एका झटक्यासरशी ॥
शिवरायाचा महाराष्ट्र तूं तोच आज का असती ॥ १ ॥

रणवाद्यांचा रव ऐकोनी सुखशय्या सोडावी ॥
प्रियाकंठिंचा कर काढोनी चपला कटिची घ्यावी ॥ २ ॥

भाल फळांचा फराळ वरती तरवारीचें पाणी ॥
प्राशन करुनी रिपु माराया सज्ज अशी तव करणी ॥ ३ ॥

मदोन्मत्त शत्रूस मर्दुनी शिरकमलांची पूजा ॥
मायभूमिच्या चरणीं बांधी हा दख्खनचा राजा ॥ ४ ॥

विसरलास का शिकवण सारी समर्थ गुरुरायांची ॥
दास्यबद्ध महाराष्ट्रा मरतां मरतां मारायाची ॥ ५ ॥

भला बुरा तूं वखत पाहुनी डावपेंच लढवावे ॥
परी शेवटीं सुयश आपुल्या पदरीं पाडुनि घ्यावें ॥ ६ ॥

नवा काळ हा ध्यानिं आणुनी नवें शस्त्र योजावें ॥
महाराष्ट्र तव नाम सार्थ हें त्रिभुवनांत गर्जावें ॥ ७ ॥
श्रीशिवबाच्या, राष्ट्रगुरूंच्या लोकमान्य टिळकांच्या ॥
सिंहा आतां त्वरीत उडवी त्वद्रिपु-मर्कट फडशा ॥ ८ ॥

---

## पद तेरावें. मालकंस——मनमोहन.

प्रभु घ्या झणिं, अवताराला ॥ धृ० ॥
छळिती रिपु बहु साधुजनांतें सत्वरि त्या संहाराला ॥ १ ॥
भारतियांच्या धर्मावरती । परसंस्कृति घालिति घाला ॥२॥
जन्मभूमि तव कर्मभूमिही । रक्षिण्यास गोपाला ॥ ३ ॥

---

## पद चवदावें. (फटका) महाराष्ट्राचा भगवा झेंडा.

महाप्रतापी भगवा झेंडा फडकुनि गेला नभोदरीं ॥
त्याची किंमत काय अम्हासी, पढतमूर्ख सत्त्वा वैरी ॥धृ०॥
काय तयांची महती वर्णू धन्य धन्य ते वीरमणी ॥
ज्यांनीं जर्जर करुनी दुस्मन सत्व रक्षिलें निबिड रणीं ॥१॥
त्यांचेवरुनी फडकत राहे भगवा झेंडा यशध्वजा ॥
प्रोत्साहन जो देइ रक्षण्या धर्म-कूल-शिल निज तेजा ॥२॥
माते-उदरीं जन्म घेउनी मातृऋणासी फेडियलें ॥
निमकहरामी स्वार्थापायीं स्वराज्य आम्हीं घालविलें ॥३॥
दाणे टाकुनि झुंजविती पर, अम्हांसि आमुच्या लोकांत ॥
मोत्यांचे जरि घोंस तोडिले फोड न झाली त्यांच्यांत ॥४॥
नाम मराठे केवळ म्हणुनी मिशा पिळाव्या क्षणाक्षण ।
आजे, पणजे, बाप, भाई ते युद्धीं मेले मम म्हणुन ॥५॥

अशा जवानांचा मी बच्चा फुशारकी ही पुरे करा ॥
ज्याचें त्यासीं शोभे मिळवा पराक्रमानें कीर्ति वरा ॥ ६ ॥
समर्थ गुरुचा समर्थ शिवबा समर्थ झाला, समर्थना ॥
परकीयांच्या सेनालहरी मराठदळ सोडुनि पवना ॥ ७ ॥
भगवा झेंडा भगव्या रंगें साक्ष देतसे धर्माची ॥
मराठशाही संन्यस्तांची, योग्यांची, न तु भोग्यांची ॥ ८ ॥
गृह-सुत-दारा सर्व पसारा सोडुनि संन्यासी बनले ॥
योगी बनुनी योग साधुनी महाराष्ट्रपण रक्षियलें ॥ ९ ॥
बाजीनें ज्या झेंड्याखालीं पवनखिंड पावन केली ॥
धनाजिनें त्या शौर्यधनानें स्वराज्यनौका हकारिली ॥१०॥
राघोबानें रणधीरानें अटकेवर सेना नेली ॥
वानवडीच्या महादजीनें दिल्लीवर स्वारी केली ॥ ११ ॥
चिमाजिनें सर केली वसई मर्द मराठे खरोखरी ॥
महाप्रतापी भगवा झेंडा फडकुनि गेला नभोदरीं ॥ १२ ॥
भगव्या झेंड्या तव लहरीवर मराठसेना नाचतसे ॥
कोठें आतां धुळींत पडला शोध तयाचा कुणा नसे ॥१३॥
महाप्रतापी शिवरायाची धर्मपताका राष्ट्र-ध्वजा ॥
खरे मराठे असाल तर ती मिळवा खर्चुनि निजतेजा ॥१४॥
भगव्या झेंड्या थकतिल मोठे कविही वर्णूं तुज जातां ॥
बलवन्तानुज शाहिर फिका पडलाही ना नवलकथा ॥१५॥

---

## पद पंधरावें. चाल--सबसे रामभजन.

हा परकी जादूगार, सारा मायेचा बाजार ॥ धृ० ॥
काय कशानें झालें ऐसें, केला काय विचार ॥
ही सोन्याची धरा जाहली, अशी कशी बेजार ॥ १ ॥

गहूं चालला हातिं भिस्कुटें, त्यांतच तुम्ही गार ॥
सोनें गेलें घरांत आला, टीनपॉट संसार ॥ २ ॥
खोटी फॅशन गळयांत आली, फिरतां दारोदार ॥
रोज पाहिजे फिरावयाला, विलायती मोटार ॥ ३ ॥
घरचे धंदे बसले तिकडे लक्ष कोण देणार ॥
लूट चालते प्रतिवर्षातें, जागे कधीं होणार ॥ ४ ॥
तुम्हि कॉलेजांत शिकतां म्हणुनी हुशार कां अनिवार ॥
खंडोगणती बुकें घोकुनी काय काढिलें सार ॥ ५ ॥
नाश कराया घटोत्कचाचा मंत्र जपा सुविचार ॥
श्रीगणनाथा हिन्दावरिचें, संकट हें झाणि वार ॥ ६ ॥

---

## पद सोळावें. चाल—लगाव लगाव लगे ढोल.

चल ऊठ बांधुनी चंग । भारता । फुंक फुंक रणशिंग ॥ घृ० ॥

हा नोकरशाही जाच ।
हा हुतुतू नंगा नाच ।
ही अधोगतीची खांच ॥ भारता फुंक० ॥ १ ॥
तुमच्यांत पाडुनी फूट ।
मिळविती सदोदित लूट ।
येइना कधीं त्या तूट ॥ भारता० ॥ २ ॥
हें होमकुंड शिक्षेचें ।
घे नित्य बळी लोकांचे ।
हे धंदे ब्यूराक्रसिचे ॥ भारता० ॥ ३ ॥
ये ऊत दडपशाहीला ।
मांडिलें घोर सत्राला ।
नावरे खेस कोणाला ॥ भारता० ॥ ४ ॥

आसेतुहिमाचल जावें ।
अनि करुणध्वनि ऐकावे ।
हे असे दिवस कां यावे ॥ भारता० ॥ ५ ॥
येथले धनी जे मूळ ।
ये त्यांना पडता काळ ।
ते निव्वळ बनले कूळ ॥ भारता० ॥ ६ ॥
कां पुरे न झाली झोंप ।
ओळखी विषारी सर्प ।
रज्जुला नको म्हणुं साप ॥ भारता० ॥ ७ ॥
अवदसा लयाला जावी ।
सुस्थिती आपणां यावी ।
कारणें दुही टाकावी ॥ भारता० ॥ ८ ॥
चल ऊठ लाग कार्याला ।
हा सांप्रत मोका आला ।
तूं अजिंक्य हो जगताला ॥ भारता फुंक फुंक
रणशिंग ॥ ९ ॥

**पद शेवटचें.** चाल—ब्यांडची [ मार्चिंगसाँग. ]

हिन्दभूमि तारणा, आर्यदास्य हारणा ॥
दुष्ट नष्ट मारणा, चला उठा, चला रणा ॥
सत्य कृत्य, सत्य वाक्य, सत्य तत्त्व, साधनीं ॥
सु-सज्ज होउनी चलाच, आत्मतेज साधनीं ॥
आर्यभूमि प्रेमला । नितांत रम्य निर्मला ॥
पर्ण पुष्प धारिणीम् । विश्ववंद्य मानिनीम् ॥
तिला स्मरूं कृती करूं, मनीं स्मरूं, गजानना ॥
आर्यभूमि तारणा, चला चला चला रणा ॥ १ ॥

समाप्त.

# महाराष्ट्र टेलरिंग फर्म.

सर्व फॅशनचे कपडे ऑर्डरीप्रमाणें शिवून मिळतील त्याचप्रमाणें हातरहाटावरील सुताच्या शुद्ध स्वदेशी गांधी टोप्या व सर्व प्रकारच्या देशी टोप्या तयार मिळतील. एकवेळ अनुभव घेऊन खात्री करून घ्या.

पत्ताः—<br>सदाशिव पेठचे<br>हौदासमोर, पुणें } प्रोप्रायटर, डी. आर. काणे.

---

# शिंपीकामाचें दुकान.

सर्व तऱ्हेचे कपडे वेळेवर शिवून दिले जातात.

विश्रामबागेसमोर,<br>पुणें शहर. } मालक, य. वा. चांदेकर.